# बोदवड महाविद्यालयात स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन

(बुधवार दिनांक ११/०९/२०१९) रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, विद्यार्थी विकास विभाग व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड ,विद्यार्थी विकास कक्ष यांच्या तर्फे युवती सभा अंतर्गत स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली, पी ओ नहाटा महाविद्यालयाच्या वनस्पती शास्त्र विभागाच्या प्राध्यापिका डॉ विद्या पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. समाज वाईट नाही पण कोणतीही परिस्थिती सांगून येत नसते त्यामुळे विद्यार्थिनींनी नेहमी सजग राहून, आत्मविश्वासाने कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाऊन सोशल मीडिया चा योग्य वापर करण्याचा सल्ला डॉ विद्या पाटील यांनी दिला.

अन्याय, अत्याचाराविरुद्ध स्वतः साठी तसेच इतरांसाठी खंबीरपणे उभे राहून प्रसंगी प्रतिकार करण्यासाठी स्वयंसिद्धा होण्याचे आवाहन प्राचार्य अरविंद चौधरी यांनी केले. तसेच मदतीचे आश्वासनही विद्यार्थिनींना दिले. विद्यार्थिनींमध्ये स्वरक्षनार्थ जागृती निर्माण करून त्यांना त्याचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देणे व आत्मविश्वास वृद्धिंगत करणे हा हेतू सलग आठ दिवस राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त शिबिराचा असल्याचे महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ गीता पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री डी एस पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी श्री नरेंद्र जोशी, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ व्ही पी चौधरी, प्रशिक्षक श्री संजय भाते ,तसेच कोमल सावकारे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु काजल पाटील व आभार कु शुभांगी नाईकनवरे हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास कक्षाचे सभासद तसेच अतुल हिवराळे, नामदेव बडगुजर, समीर पाटील यांनी परिश्रम घेतले




